दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | शुक्रवार, 7 ऑगस्ट 2026 | अंक क्र. 90 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

WEBSITE : ATULYMAHARASHTRA.COM RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM

## श्रावणाच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकला वाहतूक नियोजनावर भर, भाविकांच्या सुविधांसाठी प्रशासन सज्ज

■ नाशिक वृत्तसंस्था

श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वर नगरीत येणाऱ्या लाखो भाविकांसाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये आणि वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी, यासाठी त्र्यंबकेश्वर नगरपरिषद आणि पोलिस प्रशासनाने संयुक्त नियोजन सुरू केले आहे. नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार आणि उपनगराध्यक्षा वेदिका पाटणकर यांच्या उपस्थितीत झालेल्या आढावा बैठकीत विविध विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

भाविकांच्या सुविधांसाठी प्रशासन सज्ज श्रावण महिन्यात विशेषतः तिसऱ्या सोमवारी होणाऱ्या ब्रह्मगिरी प्रदक्षिणेसाठी मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होते. मात्र, संपूर्ण महिनाभर शहरात भाविकांची वर्दळ कायम असल्याने सर्व सुविधा वेळेत उपलब्ध करण्यावर भर देण्यात आला आहे. यासाठी शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजवणे, पथदिवे दुरुस्त करणे, धोकादायक विजेच्या तारा हटवणे, जुन्या इमारती आणि धोकादायक झाडांवर उपाययोजना करणे, तसेच शुद्ध पिण्याचे पाणी आणि आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्र्यंबकला वाहतूक नियोजनावर भर

दरम्यान, पोलिस प्रशासन, रिक्षा युनियन आणि स्थानिक गाइड यांच्यासोबतही स्वतंत्र बैठक घेण्यात आली. श्रावण काळात वाहतूक कोंडी टाळणे, रिक्षा अधिकृत ठिकाणीच उभ्या करणे, तसेच भाविकांची फसवणूक किंवा गैरवर्तन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला. श्रावण महिन्यात त्र्यंबकेश्वर नगरी भाविकांच्या स्वागतासाठी पूर्णपणे सज्ज असून, सुरक्षित आणि सुकर दर्शनासाठी प्रशासनाने सर्व यंत्रणा सज्ज ठेवल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.



## देशाच्या रक्षणाची जबाबदारी पार पाडणाऱ्या सैनिकांना समाजाने मानाचे स्थान दिले पाहिजे : माजी आमदार साहेबराव दरेकर

■ आष्टी प्रतिनिधी

देशाच्या रक्षणाची खडतर जबाबदारी अत्यंत निष्ठेने पार पाडणाऱ्या सैनिकांना समाजाने नेहमीच मानाचे व आदराचे स्थान दिले पाहिजे, असे प्रतिपादन आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे माजी आमदार साहेबराव दरेकर नाना यांनी केले. लोणी सा. (ता. आष्टी, जि. बीड) येथील भूमिपुत्र, कमांडो बाळकृष्ण दत्तात्रय चांदगुडे मेजर यांनी भारतीय सैन्यदलात सलग २६ वर्षे यशस्वी व शौर्यपूर्ण सेवा पूर्ण करून ३१ जुलै २०२६ रोजी निवृत्ती घेतली. या निमित्ताने ४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता हनुमान मंदिर सभामंडप, लोणी सा. येथे त्यांचा भव्य सेवापूर्ती सोहळा व मिरवणूक सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला, त्यावेळी अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते.

या प्रसंगी युवा नेते सागर आप्पा धस यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, जगातील कुठल्याही शक्तीला धैर्याने तोंड देण्याची हिंमत भारतीय सैन्यातच असून, प्यारा कमांडो जवान ही आपल्या सैन्यदलाची मोठी ताकद आहेत. तर सैनिकांनी सैन्यातील सेवेसोबतच निवृत्तीनंतर आपल्या माता-पित्यांची आणि समाजाची सेवा अखंडपणे चालू ठेवावी, असे प्रतिपादन युवा नेते यश आजबे यांनी केले. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार साहेबराव दरेकर नाना होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते सागर आप्पा धस, ज्येष्ठ नेते हनुमंतराव थोरवे साहेब, युवा नेते यश भैया



आजबे, ह.भ.प. राऊत महाराज (पिंपळेश्वर संस्थान) आणि ह.भ.प. नारायण महाराज वाळके (मठाधिपती, विश्वशांती भवन संस्थान) यांची प्रमुख उपस्थिती होती.

या सोहळ्यास सरपंच संजय रक्ताटे सर, सरपंच बाजीराव वाळके, रेनकू बेल्हेकर, माजी उपसभापती गोपाळभाऊ रकटाटे, पंचायत समिती सदस्य डॉ. सुभाष वाळके, चेअरमन शंकरराव राजे निंबाळकर, शिवाजी पाटील वाळके यांच्यासह पुंडी, पिंपळा, खुंटेफळ आणि कोयाळ या पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच त्रिदल सैनिक सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष अंकुश दादा खोटे, उपाध्यक्ष संजीव फसले, सहसचिव बबन दहिफळे, अहिल्यानगर अध्यक्ष संजय मस्के, आष्टी तालुका अध्यक्ष नवनाथ भगत, कार्याध्यक्ष मारुती ताकपेरे, गटप्रमुख संजय गायकवाड, दादासाहेब ठोंबरे, विठ्ठल झगडे, मेहबूब सय्यद, सचिव दिलीप मराठे, उपाध्यक्ष लियाकत खान, अंबादास गवंडे आणि मीडिया प्रमुख हनुमान झगडे यांच्यासह आष्टी तालुक्यातील सैनिक बांधवांनी उपस्थित राहून मेजर बाळकृष्ण चांदगुडे यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाची अध्यक्षीय सूचना संतोष तात्या वाळके यांनी मांडली, प्रास्ताविक विष्णू पवार मेजर यांनी केले, तर संपूर्ण कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन राजेंद्र आबा वाळके यांनी केले. या सोहळ्याचे औचित्य साधून मेजर बाळकृष्ण चांदगुडे व त्यांच्या परिवाराच्या वतीने गावातील विविध धार्मिक कार्यासाठी २५ हजार रुपयांची देणगी ग्रामस्थांकडे सुपूर्द करण्यात आली. सोहळ्यानंतर चांदगुडे परिवाराकडून उपस्थित सर्व ग्रामस्थ व पाहुण्यांसाठी भोजनाच्या पंगतीचे आयोजन करण्यात आले.



## उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्यावरील कथित आक्षेपार्ह वक्तव्याचा आष्टी रा .काँ .कडून निषेध

■ आष्टी (प्रतिनिधी)

महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ना . सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्याविषयी सोशल मीडियावर करण्यात आलेल्या कथित आक्षेपार्ह व अवमानकारक वक्तव्याचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने तीव्र निषेध व्यक्त केला आहे . याप्रकरणी संबंधित व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आष्टी तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते डॉ .अजयदादा धोंडे,यशभैय्या आजबे,संदीप सुंबरे,हरिभाऊ दहातोंडे,युवक तालुकाध्यक्ष भाऊसाहेब घुले, बाळासाहेब शिंदे, सदाभाऊ दिंडे, बबन काळे,डॉ . संतोष कदम, भाऊसाहेब पवार , महाराज यांनी आष्टीच्या तहसीलदार वैशाली पाटील यांना निवेदन दिले .

या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याविरोधात सोशल मीडियावर करण्यात आलेले कथित वक्तव्य हे महिलांचा अवमान करणारे असून अशा प्रकारामुळे समाजात चुकीचा संदेश जात आहे . महिलांच्या सन्मानाला धक्का पोहोचविणाऱ्या अशा प्रवृत्तींना वेळीच आळा घालणे आवश्यक असल्याचे म्हटले आले आहे . संबंधित व्यक्तीवर गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करावी, सोशल मीडियावर महिलांविषयी आक्षेपार्ह मजकूर प्रसारित करणाऱ्यांवर नियंत्रण आणावे आणि भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी प्रशासनाने प्रभावी उपाययोजना कराव्यात अशी मागणी करण्यात आली आहे .


यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने महिलांचा सन्मान अबाधित राखण्यासाठी प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी भूमिका मांडण्यात आली . यावेळी मोठ्या संख्येने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट कार्यकर्ते उपस्थित होते .

## महाराष्ट्रात पुढील 3 दिवस मुसळधार पावसाचा इशारा

■ मुंबई : वृत्तसंस्था

महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये पावसाचा जोर कायम असून पुढील तीन दिवस काही जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. विशेषतः मध्य महाराष्ट्रातील घाट परिसर, कोकण आणि मराठवाड्यात नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, 7 ऑगस्ट रोजी मध्य महाराष्ट्रातील घाट भागात काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडू शकतो. तसेच कोकण आणि गोव्यातही काही भागांमध्ये जोरदार पावसाचा अंदाज आहे. मराठवाड्यात विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता असून ताशी 30 ते 40 किलोमीटर वेगाने वारे वाहू शकतात. मुंबई आणि उपनगरांमध्ये आज दिवसभर आकाश ढगाळ राहण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. शहराचे कमाल तापमान सुमारे 30 अंश सेल्सिअस, तर किमान तापमान 25 अंश सेल्सिअस राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

8 ऑगस्ट रोजी उत्तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी मेघगर्जनेसह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. या भागात ताशी 40 ते 50 किलोमीटर वेगाने वारे वाहण्याचाही अंदाज आहे. 9 ऑगस्टलाही या भागांमध्ये अशाच प्रकारचे हवामान कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. दरम्यान, राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागानेही पावसाच्या पार्श्वभूमीवर सतर्कतेचा इशारा दिला आहे. जानेवारी 2026 पासून आतापर्यंत राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून एकूण 1,698 अलर्ट जारी करण्यात आले आहेत. याशिवाय वीज पडणे, अतिवृष्टी आणि भूस्खलनासंदर्भात 285 विशेष इशारे देण्यात आले आहेत. हवामान खात्याकडून मिळणाऱ्या पूर्वसूचना आणि रिअल-टाइम अलर्टच्या आधारे स्थानिक प्रशासनाला वेळोवेळी सूचना दिल्या जात आहेत. तसेच नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. पूर आणि अतिवृष्टीचा धोका लक्षात घेऊन राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांची मिळून 23 पथके राज्यातील संवेदनशील भागांमध्ये तैनात करण्यात आली आहेत. आपत्कालीन परिस्थितीत त्वरित मदत आणि बचावकार्य करण्यासाठी ही पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत.



# स्वित्झर्लंडचा ऐतिहासिक विजय; अल्जेरियाचा पराभव करत गाठली विश्वचषकाची बाद फेरी

■ व्हँकुव्हर, ब्रिटिश कोलंबिया: वृत्तसंस्था

**ब्रील एम्बोलो आणि डॅन न्दोये यांच्या शानदार गोलच्या जोरावर स्वित्झर्लंडने गुरुवारी रात्री अल्जेरियाचा २-० ने पराभव करत विश्वचषकाच्या १६ संघांच्या (नॉकआऊट) फेरीत धडक मारली आहे. या विजयामुळे स्विस संघ आता पुढील मंगळवारी व्हँकुव्हरमध्ये होणाऱ्या नॉकआऊट सामन्यासाठी सज्ज झाला आहे.**

**सामन्याचा घटनाक्रम :** सामन्याच्या सुरुवातीला पहिल्या १० मिनिटांत अल्जेरियाचे वर्चस्व दिसून आले होते, मात्र त्यानंतर स्वित्झर्लंडने सामन्याची सूत्रे हाती घेतली. योहान मानझांबीच्या चपळ असिस्टवर ब्रील एम्बोलोने गोल करून संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. एम्बोलोचा हा २६ वा आंतरराष्ट्रीय गोल ठरला.



### दुसऱ्या हाफची सुरुवात होताच

अवघ्या काही सेकंदात डॅन न्दोयेने बॉक्सच्या बाहेरून एक जोरदार फटका मारला. अल्जेरियाचा गोलकीपर लुका झिदानने झेप घेऊन चेंडू अडवण्याचा प्रयत्न केला, मात्र चेंडू वेगाने जाळ्यात शिरला आणि स्वित्झर्लंडची आघाडी २-० झाली. ८१ व्या मिनिटाला फॅबियन रायडरने तिसरा गोल करण्याची संधी निर्माण केली होती, परंतु थोडक्यात ती हुकली. पोर्तुगालचा क्रोएशियावर २-१ ने जोरदार विजय; 'राऊंड ऑफ १६'मध्ये धडक फिफा विश्वचषक २०२६ च्या 'राऊंड ऑफ ३२' (Round of 32) सामन्यात पोर्तुगाल (Portugal)ने क्रोएशियाचा २-१ असा थरारक पराभव करत 'राऊंड ऑफ १६' मध्ये

**स्वित्झर्लंडसाठी ऐतिहासिक संधी :** स्वित्झर्लंडने १९३८ नंतर बाद फेरीतील एकही सामना जिंकलेला नाही, त्यामुळे यंदाच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या स्पर्धेत २० वर्षीय मानझांबी स्विस संघाचा उदयोन्मुख तारा म्हणून समोर आला आहे. दोन गोल आणि दोन असिस्टसह त्याने आपल्या खेळाचा प्रभाव पाडला आहे. संघाची पुढील लढत आता कोलंबिया किंवा घाना यांपैकी विजेत्या संघाशी होईल. लॉस एंजेलिस : फिफा विश्वचषक २०२६ (FIFA World Cup 2026) च्या राउंड ऑफ ३२ (Round of 32) सामन्यात स्पेनने ऑस्ट्रियाचा ३-० असा एकतर्फी पराभव करत उपांत्यपूर्व फेरीत (Round of 16) दमदार ...

**अल्जेरियाचे आव्हान संपुष्टात :** २०१४ नंतर प्रथमच विश्वचषकात पुनरागमन करणाऱ्या अल्जेरियासाठी ही स्पर्धा निराशाजनक ठरली. अल्जेरियाचे प्रशिक्षक व्लादिमीर पेटकोविच, ज्यांनी एकेकाळी स्विस संघाचे यशस्वी नेतृत्व केले होते, त्यांना आपल्या माजी संघाविरुद्ध पराभवाचा सामना करावा लागला. या महत्त्वाच्या सामन्याला फिफाचे अध्यक्ष जियानी इन्फँटिनो यांनी देखील उपस्थिती लावली होती. एका आठवड्याच्या सुट्टीनंतर सॅन दिएगो येथील प्रशिक्षण तळावरून परतलेल्या स्विस संघाने या विजयाने आपला आत्मविश्वास उंचावला आहे.

## आयर्लंडमधल्या जखमा अजून ताज्या, इंग्लंडमध्ये श्रेयसचा 'तो' निर्णय अनपेक्षित, माजी क्रिकेटर काय म्हणाला?

■ मुंबई : वृत्तसंस्था

इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात श्रेयस अय्यरच्या एका निर्णयाने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. ढगाळ वातावरण आणि पावसाची शक्यता असतानाही त्याने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. साधारणपणे अशा परिस्थितीत संघ आधी गोलंदाजीच निवडतात. मग श्रेयसने हा निर्णय का घेतला? यावर माजी क्रिकेटपटू दिनेश कार्तिकने मोठं विधान केलं आहे. चेस्टर-ले-स्ट्रीट येथे भारताने प्रथम फलंदाजी करत ७ बाद १८९ धावा केल्या. मात्र, त्यानंतर पावसामुळे इंग्लंडचा डाव सुरूच होऊ शकला नाही आणि सामना अनिर्णित राहिला. पण श्रेयसच्या निर्णयाची चर्चा कायम राहिली.

### आयर्लंडविरुद्धच्या पराभवाचा परिणाम?

■ कार्तिकच्या मते, या निर्णयामागे आयर्लंड दौऱ्यातील पराभवाचा परिणाम असू शकतो. त्या मालिकेत भारताला दोनही सामने गमवावे लागले होते. त्यामुळे पुन्हा धावांचा पाठलाग करताना दबाव येऊ नये, म्हणून भारताने आधी फलंदाजी करण्याचा पर्याय निवडला असावा. क्रिकबझवर बोलताना कार्तिक म्हणाला, "अशा हवामानात बहुतांश संघ आधी गोलंदाजी करतात. पण भारताने वेगळा निर्णय घेतला. मला वाटतं, आयर्लंड दौऱ्याचा परिणाम अजूनही संघाच्या मनात होता. त्यामुळे प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला गेला."

### श्रेयसवर होता दबाव

■ आयर्लंड दौरा श्रेयससाठी अत्यंत खराब ठरला होता. दोन सामन्यांत त्याच्या बॅटमधून अवघ्या १३ धावा आल्या होत्या. त्यामुळे इंग्लंडविरुद्धची खेळी त्याच्यासाठी खूप महत्त्वाची होती. याबाबत कार्तिक म्हणाला, "कर्णधार म्हणून श्रेयसवर दबाव होता. अशावेळी स्वतः धावा करून संघाला पुढे नेणं गरजेचं असतं. त्याने तेच केलं. 'मी कर्णधार आहे आणि मी संघासाठी धावा करेन,' हा संदेश त्याने आपल्या खेळातून दिला.




### सुरुवातीला धक्के, मग श्रेयस-अभिषेकची भागीदारी

■ भारताची सुरुवात खराब झाली. संजू सॅमसन एका धावेवर, तर ईशान किशन शून्यावर बाद झाला. मात्र, त्यानंतर अभिषेक शर्मा आणि श्रेयस अय्यर यांनी डाव सावरला. अभिषेकने २४ चेंडूत ५९ धावांची आक्रमक खेळी केली. श्रेयसनेही जबाबदारीने फलंदाजी करत ४७ चेंडूत ६८ धावा केल्या. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ८२ धावांची महत्त्वाची भागीदारी केली.

## भारतीय संघ इंग्लंडनंतर श्रीलंका दौऱ्यावर, BCCIकडून कसोटी मालिका जाहीर

■ मुंबई : वृत्तसंस्था



भारतीय संघ आता इंग्लंड दौऱ्यावर असून टी-२० आणि वन डे मालिका होणार आहे. ५ टी-२० सामने आणि ३ वनडे सामने झाल्यावर भारताचा श्रीलंका दौरा असणार असून त्यासाठीचे बीसीसीआयने पुढील श्रीलंका दौऱ्याचे वेळापत्रक जाहीर केले आहे. श्रीलंका दौऱ्यामध्ये भारतीय संघाचे दोन कसोटी सामने असणार आहेत. दोन कसोटी सामने नेमके केव्हा असणार जाणून घ्या.

■ **श्रीलंका दौऱ्याची घोषणा**

इंग्लंड दौऱ्यावर असलेल्या भारतीय संघाचा अखेरचा सामना १९ जुलैला असणार आहे. त्यानंतर भारताचा श्रीलंका दौरा असणार आहे. बीसीसीआयने जाहीर केलेल्या दोनमधील पहिला कसोटी सामना १५ ऑगस्ट ते १९ ऑगस्टमध्ये असणार आहे. त्यानंतर पुढचा सामना २३ ऑगस्टला होणार असून हे दोन्ही सामने भारतीय वेळेनुसार सकाळी दहा वाजता सुरू होणार आहेत. वेळेबाबत अद्याप अधिकृत अशी माहिती दिली नाही.

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीपमध्ये भारताला आपले आव्हान ठेवण्यासाठी श्रीलंकेमध्ये होणारी दोन सामन्यांची मालिका महत्त्वाची असणार आहे. आता मागे घरच्या मैदानावर भारताला दक्षिण आफ्रिका संघाने पराभूत केले होते. भारताने या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीपमध्ये ९ सामन्यांमध्ये ४ सामने जिंकले होते. कसोटी पॉइंट टेबलमध्ये ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड हे संघ टॉप तीनमध्ये आहेत. त्यामुळे कमबॅक करण्यासाठी भारताला ही मालिका जिंकावी लागणार आहे. आता भारतीय संघाने अफगाणिस्तानसोबत एक कसोटी सामना खेळला होता. त्यामध्ये भारताने सहज विजय साकारला होता पण त्या विजयाला वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीपमध्य ग्राह्य धरता येणार नव्हते. या एकमेक कसोटीमध्ये अफगाणिस्तानविरूद्ध अनेक युवा खेळाडूंनी पदार्पण केले होते. यामधील मानव सुथार हा सात विकेट घेत सामनावीर ठरला होता.

भारत वि. श्रीलंका कसोटी सामने वेळापत्रक पहिला कसोटी सामना- १५ ऑगस्ट २०२६ ते १९ ऑगस्ट २०२६ (गॉल) दुसरा कसोटी सामना- २३ ऑगस्ट- २०२६ ते २७ ऑगस्ट २०२६ (कोलंबो)

■ **भारत-श्रीलंका हेड टू हेड (श्रीलंका)**

दरम्यान, श्रीलंकेमध्ये भारताचा रेकॉर्ड इतकाही खास नाहीये. कारण २७ सामन्यांमध्ये भारताला ९ मध्येच विजय मिळवता आले आहे. पण ७ सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला असून ११ सामने अनिर्णित राहिले. त्यामुळे शुभमन गिलच्या नेतृत्त्वात भारतीय संघासमोर श्रीलंकेमधील दोन कसोटी सामने आव्हानाप्रमाणेच असणार आहेत.



## स्पेनचा दणदणीत विजय! ऑस्ट्रियाला ३-० ने हरवत उपांत्यपूर्व फेरीत धडक

■ लॉस एंजेलिस : वृत्तसंस्था

फिफा विश्वचषक २०२६ च्या राऊंड ऑफ ३२ सामन्यात स्पेनने ऑस्ट्रियाचा ३-० असा एकतर्फी पराभव करत उपांत्यपूर्व फेरीत (Round of 16) दमदार प्रवेश केला. स्पेनच्या विजयाचा शिल्पकार ठरलेल्या मिकेल ओयारझाबाल (Mikel Oyarzabal) याने दोन गोल झळकावले, तर पेद्रो पोरो (Pedro Porro) याने एक गोल करत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

सामन्याच्या ३६व्या मिनिटाला मार्क कुकुरेला याच्या अचूक मागील पासवर (cutback) मिकेल ओयारझाबालने गोल करत स्पेनला १-० अशी आघाडी मिळवून दिली. दुसऱ्या हाफमध्ये ६६व्या मिनिटाला पेद्रो पोरोने शानदार गोल करत स्पेनची आघाडी २-० अशी दुप्पट केली. विशेष म्हणजे, वरिष्ठ आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील हा त्याचा पहिलाच गोल ठरला. सामन्याच्या ८९व्या मिनिटाला पुन्हा एकदा मार्क कुकुरेला आणि मिकेल ओयारझाबाल यांच्या उत्कृष्ट समन्वयातून स्पेनने तिसरा गोल केला आणि ३-० असा दणदणीत विजय निश्चित केला. दरम्यान, पहिल्या हाफमध्ये मार्क कुकुरेलाने केलेला एक गोल ऑस्ट्रियाच्या गोलरक्षकावर फाऊल झाल्यामुळे अमान्य करण्यात आला. या विजयासह स्पेनने तब्बल १६ वर्षांनंतर विश्वचषकाच्या बाद फेरीत विजयाची नोंद केली. याआधी स्पेनने २०१० च्या विश्वचषकात बाद फेरीतील सामना जिंकला होता आणि त्याच वर्षी विश्वविजेतेपदही पटकावले होते.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# मुंबईत रंग, स्मृती आणि अमूर्त कलेचा अद्वितीय सोहळा ; ज्येष्ठ चित्रकार कैलास ह्याळीज यांच्या नव्या चित्रमालिकेचे प्रदर्शन

**मुंबई** - भारतीय समकालीन चित्रकलेतील ज्येष्ठ आणि स्वतंत्र शैलीचे चित्रकार कैलास निंबाजी ह्याळीज यांच्या 'कलर, मेमरी अँड द पर्जिस्टन्स ऑफ फॉर्म' या नव्या अमूर्त चित्रमालिकेचे एकल चित्रप्रदर्शनाचे आयोजन ४ ते १० ऑगस्ट २०२६ या कालावधीत मुंबईतील ऐतिहासिक जहांगीर आर्ट गॅलरी, फोर्ट येथे करण्यात आले आहे. गेल्या अनेक दशकांतील कलासाधनेचा परिपाक असलेल्या त्यांच्या नव्या चित्रमालिकेचे हे प्रदर्शन असून, भारतीय समकालीन अमूर्त कलेचा एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून त्याकडे पाहिले जात आहे.

या प्रदर्शनात विविध आकारमानातील ॲक्रिलिक ऑन कॅनव्हास चित्रांचा समावेश असून, प्रत्येक कलाकृती रंग, स्मृती, निसर्ग आणि मानवी अनुभव यांच्या सूक्ष्म नात्याचा शोध घेते. ठळक रंगसंगती, वनस्पतीसदृश प्रतीके, वैशिष्ट्यपूर्ण अमूर्त आकृतिबंध आणि पुनरावृत्ती होणारी मध्यवर्ती चिन्हे ही ह्याळीज यांच्या चित्रशैलीची ओळख बनली आहे.

प्रदर्शनाच्या संकल्पनेत “रंग” हा केवळ दृश्य अनुभव नसून भावना, स्मृती आणि काळाचा प्रवास व्यक्त करणारे माध्यम म्हणून मांडला आहे. जांभळा, निळा, हिरवा, केशरी आणि लाल यांसारख्या ठळक रंगांच्या माध्यमातून कलाकाराने ऊर्जा, शांतता, परिवर्तन आणि आशावाद यांचे दृश्यरूप साकारले आहे.


चित्रांमध्ये दिसणारी वनस्पतीसदृश चिन्हे, पानांचे आकार आणि मध्यभागी दिसणारी प्रतीकात्मक रचना कोणतीही निश्चित कथा सांगत नाहीत; मात्र प्रत्येक प्रेक्षकाला स्वतःच्या अनुभवातून त्यांचे अर्थ शोधण्याचे स्वातंत्र्य देतात. त्यामुळे प्रत्येक चित्र वेगवेगळ्या व्यक्तीसाठी वेगळा अनुभव निर्माण करते.

स्मृती, निसर्ग आणि आधुनिकतेचा संगम. कैलास ह्याळीज यांच्या कलाकृतींमध्ये स्मृती आणि वर्तमान यांचा सुरेख मिलाफ दिसून येतो. त्यांच्या चित्रांतील प्रतीके कधी झाडांची आठवण करून देतात, तर कधी आदिम संस्कृतीतील चिन्हांसारखी वाटतात. निसर्गातील सतत चालणारे परिवर्तन, वाढ, पुनर्जन्म आणि जीवनचक्र यांचे प्रतिबिंब त्यांच्या चित्रांमध्ये स्पष्ट जाणवते.

तीन दशकांची सातत्यपूर्ण कलासाधना १९९० नंतर भारतीय कला विश्वात झालेल्या मोठ्या बदलांच्या काळात कैलास ह्याळीज यांनी स्वतःची स्वतंत्र शैली विकसित केली. बाजारपेठेतील बदल, नव्या माध्यमांचा प्रभाव आणि बदलते कलाप्रवाह यांच्यामध्येही त्यांनी अमूर्त चित्रकलेशी असलेली नाळ कायम ठेवली. प्रयोगशीलता, रंगांवरील प्रभुत्व आणि वैयक्तिक दृश्यभाषा ही त्यांच्या कामाची प्रमुख वैशिष्ट्ये मानली जातात.

देशभरात अनेक ठिकाणी चित्र प्रदर्शन संपन्न झाली असून कैलास ह्याळीज यांनी नाशिक, पुणे, मुंबई, कोलकाता, गोवा, केरळ यांसह देशातील विविध शहरांमध्ये एकल आणि समूह चित्रप्रदर्शने भरवली आहेत. चित्रकला महाविद्यालय, नाशिक येथून फाइन आर्ट्सचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी चित्रकलेला पूर्णवेळ वाहून घेतले. त्यांच्या कलाकृतींना आर्ट सोसायटी ऑफ इंडिया, मुंबई, जवाहरलाल दरडा कला अकादमी, नाशिक यांसारख्या संस्थांचे पुरस्कारही प्राप्त झाले आहेत.

कला रसिकांसाठी पर्वणी मुंबईतील प्रतिष्ठित जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये भरत असलेले हे प्रदर्शन कला विद्यार्थी, चित्रकार, संशोधक, संग्राहक आणि कला रसिकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे. भारतीय अमूर्त चित्रकलेतील समकालीन प्रवाह समजून घेण्याची आणि एका अनुभवी कलाकाराच्या रंगविश्वाचा जवळून अनुभव घेण्याची ही दुर्मीळ संधी आहे. प्रदर्शनास प्रवेश सर्वांसाठी विनामूल्य आहे.














# जिल्हाधिकाऱ्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा ; बीड शहरातील वाहतूक कोंडी व अतिक्रमणांबाबत शहर बचाव मंचाचे निवेदन

बीड | प्रतिनिधी



जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची वाढदिवसानिमित्त बीड शहर बचाव मंचाच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन त्यांना निरोगी, यशस्वी व दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी मंचाच्या वतीने बीड शहरातील वाढती वाहतूक कोंडी, अनियंत्रित रहदारी, अतिक्रमणे आणि नागरी सुविधांशी संबंधित विविध प्रश्नांबाबत सविस्तर निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आले.

याचप्रमाणे वाहतूक पोलीस निरीक्षक वैभव पाटील, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके तसेच पोलीस अधीक्षक यांनाही स्वतंत्र निवेदने देऊन शहरातील गंभीर प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.

निवेदनात शहरातील मुख्य रस्ते, चौक व बाजारपेठांमधील अतिक्रमणे हटवून वाहतूक सुरळीत करणे, फुटपाथ नागरिकांसाठी मोकळे करणे, इमारतींच्या पार्किंगसंदर्भातील मंजूर आराखड्यांची पडताळणी करणे, रस्त्यांवरील बेशिस्त पार्किंगला आळा घालणे, शहरातील निष्क्रिय वाहतूक सिग्नल तातडीने सुरू करणे, आवश्यक ठिकाणी प्लास्टिक बॅरिकेड्स बसविणे, स्वच्छता व्यवस्थेत सुधारणा करणे तसेच मोकाट जनावरे व भटक्या कुत्र्यांच्या प्रश्नावर प्रभावी कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

बीड शहरात वाहतूक सुरळीत करण्यासाठी सुरू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेचे मंचाने स्वागत करत प्रशासनाने ही मोहीम अधिक प्रभावीपणे राबवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच सुरक्षित फुटपाथ हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असून त्याची अंमलबजावणी करणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले.

यावेळी बीड शहर बचाव मंचाचे अध्यक्ष नितीन जायभाये, मार्गदर्शक प्राचार्य कॉ. डी. जी. तांदळे, ॲड. अनिल बारगजे, ॲड. नितीन वाघमारे, डॉ. संजय तांदळे, बाळासाहेब मोरे, पाशाभाई शेख, ॲड. राम अण्णा बडे, सेवानिवृत्त शामराव मार्कंडे, सारिका गायकवाड, सादेकभाई शेख, बाजीराव ढाकणे यांच्यासह शहर बचाव मंचाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.



**आष्टी - आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष तथा मुख्याध्यापक जावेद पठाण यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, आदर्श शिक्षक पत्रकार राजेंद्र लाड,विमा सल्लागार अतिक शेख,शिवरायांचा मावळा समीर शेख, गणेश शिंदे, सामाजिक कार्यकर्ते सचिन पवार आदी दिसत आहेत.**

# महिला महाविद्यालयात प्रथमवर्ष विद्यार्थिनी स्वागत सोहळा संपन्न

परळी | वार्ताहर




आज येथील कै .लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात प्रतिवर्षाप्रमाणे प्रथमवर्ष प्रविष्ट विद्यार्थिनींच्या स्वागतसोहळा .. कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख हे लाभले .तर प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ .विद्याताई देशपांडे हे उपस्थित होते. सर्वप्रथम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ विद्या देशपांडे यांनी सर्व विद्यार्थिनींना महविद्यालयीन जीवनासाठी शुभेच्छा दिल्या . उद्बोधनपर व्याख्यान सत्रात प्रा .फुलारी एन जी यांनी परीक्षेच्या स्वरूपाविषयी व स्कॉलरशिप संदर्भात उचित माहिती दिली . त्यानंग

डॉ विवेकानंद कवडे यांनी राष्ट्रीय सेवायोजनेच्या संदर्भात योग्य माहिती दिली . राष्ट्र विचार प्रथम तर स्वतःचा विचार नंतर . सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी रासेयो आहे . समाजसेवेतून शिक्षण जनजागृती महत्वाने होते असे मत मांडले . महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा कोकाट यांनी ग्रंथालयाची व ग्रंथ देवाण घेवाण पद्धतिविषयक इत्थंभूत माहिती दिली . तसेच क्रीडा विभाग प्रमुख डॉ प्रवीण दिग्रसकर यांनी क्रीडा विभागातर्फे होत असलेल्या - विद्यापीठीय आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेची व महाविद्यालयात होत असलेल्या अनेक क्रीडा प्रकारांची योग्य माहिती दिली . महाविद्यालयांतील अंतर्गत तक्रार निवारण समिती प्रमुख डॉ रागिणी पाध्ये यांनी विद्यार्थिनींना होत असलेल्या त्रासाच्या निवारणा साठीची उचित माहिती दिली . शेवटी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ अरुण चव्हाण यांनी महाविद्यालयांतील सांस्कृतिक विभागातर्फे होत असलेल्या विविध स्पर्धा व कार्यक्रमाची माहिती दिली .

अध्यक्षीय समारोपपर भाषणात प्रा प्रसाद देशमुख यांनी सर्वप्रथम विद्यार्थिनींचे अभिनंदन व स्वागत करून महाविद्यालयाच्या समग्र उपक्रमांची माहिती देऊन यशस्वी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या प्रस्तुत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ शिवनारायण वाघमारे यांनी केले तर डॉ अरुण चव्हाण यांनी आभार मानले .या कार्यक्रमासाठी प्राध्यापक वृंद शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# जालन्यात दीड लाखांची लाच स्वीकारताना प्राचार्यांना अटक :समाजकार्य महाविद्यालयातील धक्कादायक प्रकार, 'एसीबी'ची धडक कारवाई

जालना | जालना शहरात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने धडक कारवाई करत महात्मा ज्योतिबा फुले समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य, अधीक्षक, लिपीक, शिपाई आणि ग्रंथपाल यांना तब्बल दीड लाख रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले आहे. एका सेवानिवृत्त प्रबंधकाला त्यांच्या कालबद्ध पदोन्नतीचा लाभ आणि भविष्य निर्वाह निधीची रक्कम मिळवून देण्यासाठी या लाचेची मागणी करण्यात आली होती. ही रक्कम स्वीकारताना एसीबीने या पाचही जणांवर कारवाईचा बडगा उगारला असून, या धक्कादायक घटनेमुळे संपूर्ण जालना शहरात मोठी खळबळ उडाली आहे.



तक्रारीची पडताळणी केल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने आज महाविद्यालयातच सापळा रचला आणि लाचेची रक्कम स्वीकारताच प्राचार्य राहुल हिवराळे व अधीक्षक बबन राठोड यांच्यासह पाचही जणांना रंगेहात पकडून ताब्यात घेतले. एसीबीच्या या धडक कारवाईमुळे जालना शहरात मोठी खळबळ उडाली असून, याप्रकरणी तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून पोलिसांकडून पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे.

जालना शहरात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) धडक कारवाई करत महात्मा ज्योतिबा फुले समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य, अधीक्षक, लिपीक, शिपाई आणि ग्रंथपाल यांना दीड लाख रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले आहे. अवघ्या 10 दिवसांच्या अंतराने शहरात लाचखोरीची ही दुसरी मोठी घटना उघडकीस आल्याने सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे.

यापूर्वी, केवळ दहा दिवसांआधी एसीबीच्या पथकाने राज्य कर विभागातील महिला अधिकारी सुवर्णा लोहिया आणि खासगी कर सल्लागार अक्षय लोढा यांना 60 हजार रुपयांची लाच स्वीकारताना कार्यालयातच रंगेहात पकडले होते. एका इलेक्ट्रॉनिक वस्तू विक्रेत्याचे 'इनपुट टॅक्स क्रेडिट' अनब्लॉक करून देण्यासाठी एक लाख रुपयांची मागणी करण्यात आली होती आणि तडजोडीअंती 60 हजार रुपये स्वीकारताना त्यांच्यावर ही कारवाई झाली होती. याप्रकरणी कदीम जालना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली होती. अवघ्या 10 दिवसांच्या फरकाने जालना शहरात लाचखोरीच्या या दोन मोठ्या कारवाया झाल्याने प्रशासकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे.

# एमबीबीएस डॉक्टरांचा सरकारच्या सीसीएमपी (CCMP) कोर्स योजनेला तीव्र विरोध

**सीसीएमपी कोर्स एमबीबीएसची जागा घेऊ शकत नाही! - डॉ. विजय रांदड**

**१ वर्षाचा कोर्स आणि ५ वर्षांचे शिक्षण समान कसे? - डॉ. शालिनीताई कराड यांचा सवाल**



**एमबीबीएस शिक्षणाशिवाय ॲलोपॅथीची प्रॅक्टिस करण्याची परवानगी दिल्यास वैद्यकीय सेवेचा दर्जा घसरेल - डॉ. सतीश गुट्टे**

## परळीत आयएमएचे तहसीलदारांना निवेदन







**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

सरकारने १ वर्षाचा सीसीएमपी (CCMP) अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या बीएचएमएस (BHMS) डॉक्टरांना 'महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल' (MMC) मध्ये नोंदणी देऊन आधुनिक वैद्यकशास्त्राची (ॲलोपॅथी) प्रॅक्टिस करण्याची परवानगी देण्याच्या प्रस्तावाला इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA), परळी वैजनाथ शाखेने जोरदार विरोध दर्शवला आहे. या निर्णयाविरोधात गुरुवारी डॉक्टरांच्या शिष्टमंडळाने उपविभागीय अधिकारी व तहसीलदारांना निवेदन दिले, तसेच सरकारच्या या धोरणाविरुद्ध जोरदार घोषणाबाजी केली.

- **रुग्ण सुरक्षेचा प्रश्न व वैद्यकीय सेवेच्या दर्जाबाबत चिंता**

निवेदनात नमूद केल्यानुसार, एमबीबीएस डॉक्टरांच्या ५ वर्षांच्या सर्वसमावेशक वैद्यकीय आणि क्लिनिकल (नैदानिक) प्रशिक्षणाची जागा केवळ १ वर्षाचा सीसीएमपी कोर्स घेऊ शकत नाही. पूर्णवेळ एमबीबीएस शिक्षणाशिवाय ॲलोपॅथीची प्रॅक्टिस करण्याची परवानगी दिल्यास वैद्यकीय सेवेचा दर्जा घसरेल आणि रुग्णांच्या प्राणांशी खेळ होऊन त्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण होईल, अशी तीव्र भीती डॉक्टरांनी व्यक्त केली आहे.

या विरोधाचा भाग म्हणून शहरातील एमबीबीएस डॉक्टरांनी 'काम बंद' आंदोलन सुरु केले आहे. या निवेदनावर आयएमए परळी शाखेचे अध्यक्ष डॉ. अजित केंद्रे आणि डॉ. विजय रांदड यांच्यासह संघटनेच्या इतर पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. यावेळी आंदोलनात डॉ. शालिनी कराड, डॉ. बालासाहेब कराड, डॉ. मधुसूदन काळे, डॉ. रंजना घुगे, डॉ. लक्ष्मीनारायण लोहिया, डॉ. अर्षद शेख, डॉ. सतीश गुट्टे, डॉ. श्रीगोपाल व सौ. श्रीगोपाल झंवर, डॉ. स्मिता तापडिया, डॉ. संजय गित्ते, डॉ. वैभव डुबे, डॉ. राजेश जाजू, डॉ. सोळंके यांच्यासह शहरातील अनेक महिला व पुरुष डॉक्टर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेकडो समाजबांधवांच्या साक्षीने पुसद येथे महाराष्ट्र गवळी समाज संघटनेचा भव्य-दिव्य गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा संपन्न

## हंसराज भैय्या अहिर यांच्या अध्यक्षतेखाली गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव; समाजातील सर्व शिक्षक-शिक्षिकांचा मानाच्या फेट्याने सन्मान

**महागाव | प्रतिनिधी**

शेकडो समाजबांधवांच्या साक्षीने पुसद येथील जिजामाता मंगलम, कारला रोड येथे महाराष्ट्र गवळी समाज संघटनेचे तालुकाध्यक्ष तथा युवा उद्योजक वैभव फुके यांच्या नेतृत्वाखाली दहावी व बारावीमध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य-दिव्य गुणगौरव व सत्कार सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. समाजातील शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला समाजातील ज्येष्ठ नागरिक, महिला, शिक्षक-शिक्षिका, उद्योजक, पालक, विद्यार्थी व समाजबांधवांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजाचे भूषण, ज्येष्ठ नेतृत्व माननीय हंसराज भैय्या अहिर, माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री तथा माजी राष्ट्रीय अध्यक्ष, ओबीसी आयोग उपस्थित होते.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मा. ना. ॲड. इंद्रनीलभाऊ नाईक, राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघाचे लाडके खासदार संजय भाऊ देशमुख, मा. ॲड. निलय भाऊ नाईक, माजी आमदार विधान परिषद, प्राध्यापक गोविंद फुके सर, कृषी शास्त्रज्ञ, श्री अशोक मंडले, श्री राजेश यमगवळी, प्रवीण हुंडीवाले, डॉ. नानाभाऊ फुके, दिलीपराव पारध, बबनराव पारध, जयाजीराव मंदाडे सर, शरद कुबडे, नारायण पुलाते, महेश अवथळे, हमीद भाई प्यारे वाले तसेच समाजातील ज्येष्ठ नागरिक, महिला, सर्व शिक्षक-शिक्षिका, उद्योजक, पालक



व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना महाराष्ट्र गवळी समाज संघटनेचे तालुकाध्यक्ष तथा युवा उद्योजक वैभव फुके यांनी केली. आपल्या प्रस्तावनेत त्यांनी सांगितले की, "समाजाने आम्हाला दिलेले अध्यक्षपद हे केवळ खुर्चीवर बसण्यासाठी नसून समाजासाठी कार्य करण्यासाठी दिलेले आहे. समाजातील ज्येष्ठ मंडळी आमच्यासाठी नेहमीच मार्गदर्शक राहतील आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली समाजहिताचे असेच मोठे व विधायक उपक्रम सातत्याने राबविले जातील."

यानंतर मा. ना. ॲड. इंद्रनीलभाऊ नाईक यांनी आपल्या भाषणात गवळी समाजातील विवाह सोहळे वेळेवर पार पडण्याच्या शिस्तबद्ध परंपरेचे विशेष कौतुक करत इतर समाजांनीही त्यापासून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले. तसेच या भव्य कार्यक्रमाच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल महाराष्ट्र गवळी समाज संघटनेचे कौतुक करत अध्यक्ष वैभव फुके



यांच्या नियोजनक्षमतेचे विशेष अभिनंदन केले. "वैभव फुके कोणताही कार्यक्रम अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने आणि मोठ्या स्वरूपात यशस्वीपणे आयोजित करतात," असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

यानंतर यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघाचे लाडके खासदार संजय भाऊ देशमुख यांनी कार्यक्रमातील सूक्ष्म नियोजनाचे कौतुक केले. गवळी समाजाच्या प्रामाणिकपणाबद्दल आणि समाजबांधवांनी नेहमी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. त्यानंतर त्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र गवळी समाज संघटनेचे प्रदेश संघटक सचिव श्री अशोक मंडले यांनी संघटनेचे महत्त्व, समाजातील एकजूट आणि संघटनशक्ती याविषयी मार्गदर्शन करत विद्यार्थी व पालकांना शुभेच्छा दिल्या.

या भव्य गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याचे आणखी एक विशेष आकर्षण म्हणजे समाजातील सर्व शिक्षक व शिक्षिकांचा करण्यात आलेला सन्मान होय. महाराष्ट्र गवळी समाज संघटनेचे तालुकाध्यक्ष वैभव फुके यांच्या संकल्पनेतून व पुढाकारातून समाजातील सर्व शिक्षक व शिक्षिकांना मानाचा फेटा बांधून सन्मानित करण्यात आले. समाज घडविण्यात शिक्षकांचे योगदान अमूल्य असून त्यांच्या कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. उपस्थित शिक्षकवृंदांनी या सन्मानाबद्दल संघटनेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षकांना मानाचा फेटा बांधून सन्मानित करण्याच्या कार्यक्रमाचे नियोजन बाळकृष्ण मंडाडे सर व अजिंक्य पुलाते सर यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडले.

अध्यक्षीय भाषणात माननीय हंसराज भैय्या अहिर यांनी सर्वप्रथम कार्यक्रमाच्या भव्य आणि उत्कृष्ट आयोजनाबद्दल आयोजकांचे भरभरून कौतुक केले व गुणवंत विद्यार्थ्यांना आशीर्वाद दिले. त्यांनी युवकांनी नोकरीसोबत आपल्या पारंपरिक व्यवसायालाही प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले. आजच्या भेसळयुक्त वातावरणात शुद्ध दूध, दही, तूप यांसारख्या दुग्धजन्य पदार्थांबाबत गवळी समाजावर जनतेचा मोठा विश्वास असल्याचे सांगत समाजाने आपला पारंपरिक व्यवसाय जपून समाजसेवा सुरू ठेवावी, असे मार्गदर्शन त्यांनी केले.

या भव्य गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी वैभव फुके यांच्यासोबत संपूर्ण महाराष्ट्र गवळी समाज संघटना खांद्याला खांदा लावून कार्यरत होती. त्यामध्ये ॲड. विकास पारध (सचिव), शंकरराव ढोकणे (उपाध्यक्ष), साहेबराव साखरे (उपाध्यक्ष), वेदांत पुलाते (सहसचिव) आणि गणेश पुलाते (कोषाध्यक्ष) यांनी संघटनेच्या वतीने विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोविंद यांनी केले, तर विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे सूत्रसंचालन प्राध्यापक अनिल मंदाडे यांनी केले. त्यांच्यासमवेत प्राध्यापक सुरेंद्र बोरकुट, सुनील पुलाते, मनोज कुबडे आणि योगेश पुलाते यांनी विद्यार्थ्यांच्या सत्काराचे उत्कृष्ट नियोजन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष हिरामण आप्पा गवळी, प्रदेश सचिव शरद कुबडे, जिल्हाध्यक्ष नारायणराव पुलाते, डॉ. बोरकुट तसेच उद्योजक गजाननभाऊ मंडाडे यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.